# माहितीचा अधिकार कायदा, २००५

## नागरिकांसाठी मार्गदर्शिका


**माहितीचा अधिकार कक्ष,**
**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी**

राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे - ४११ ००७. भारत
टेलीफोन : २५६०८१४६

Website : www.yashada.org    email : rtiyashada@gmail.com

# माहितीचा अधिकार कायदा, २००५

## नागरिकांसाठी मार्गदर्शिका

# मार्गदर्शिका

## (माहितीचा अधिकार अधिनियम २००५)

### पार्श्वभूमी

भारताच्या राज्यघटनेनुसार भारतीय नागरीकांनी भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून स्थापण्याचे घोषित केले आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी राज्य घटनेने कार्यकारी मंडळ, विधिमंडळ व न्यायमंडळ या संस्थात्मक संरचेनेची निर्मिती केली आहे. काळाच्या ओघामध्ये या संघराज्य व्यवस्थेमध्ये व त्याच्या विविध संस्थांमध्ये तसेच नागरिकांच्या सहभागातही उदासीनता आल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. आज मितीस म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सहाव्या दशकातही नागरिकांचा राज्य कारभारामध्ये मतदानापलिकडे फारसा सक्रिय सहभाग दिसून येत नाही.

वास्तविक भारतासारख्या प्रातिनिधीक लोकशाही राष्ट्रात सार्वजनिक जीवनातील प्रत्येक महत्वाच्या बाबींवर हिरीरीने मतप्रदर्शन करून नागरिकांकडून राज्य कारभारात उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. राज्यघटनेने त्यासाठी नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मूलभूत हक्क म्हणून बहाल केले आहे. अर्थात नागरिकांना त्यांचे माहितीपूर्ण मत मांडण्यासाठी शासनाच्या कार्यपद्धतीची माहिती व सार्वजनिक हिताच्या बाबी कशा हातळल्या जातात याची माहिती मिळणे आवश्यक आहे. ही माहिती नागरिकांना प्राप्त व्हावी हा 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' लागू करण्यामागचा मुख्य उद्देश आहे.

माहितीचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राज्य कारभारात अभ्यासू नागरिकांचा सहभाग यांची सांगड असणे आवश्यक आहे, ही भूमिका आता जगभर मान्य झाली आहे. जगभर माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून

मान्यता पावू लागला आहे, व तो नागरिकांना प्राप्त होण्यासाठी आजपावेतो ५६ देशात खास कायदे पारित करण्यात आले आहेत. भारताने 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' पारीत करुन अशा स्वरुपाचे कायदे केलेल्या देशांच्या समूहात प्रवेश केला आहे. तद्वतच सुमारे २५ इतर देशात अन्य स्वरूपात अशा प्रकारचा हक्क नागरिकांना बहाल करण्यात आला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमाचे दुहेरी फायदे आहेत. वैयक्तिक पातळीवर तुम्हांला तुमच्या आवश्यकतेनुसार हवी ती माहिती त्वरीत प्राप्त होते. उदा:- आवश्यक ती प्रमाणपत्रे, दस्तऐवज विविध शासकीय कार्यालयातून प्राप्त करण्यापासून, कार्यालयात प्रलंबित असलेल्या तुमच्या अर्जाची किंवा प्रकरणाची सद्यस्थिती पर्यंतच्या अनेक बाबींचा यात समावेश होतो. त्यामुळे कार्यालयात घालावे लागणारे हेलपाटे, संदिग्ध माहिती अथवा दुरुत्तरे या जाचातून सुटका होते. तसेच आपली हक्काची माहिती मिळविण्यासाठी हांजी- हांजी करण्याचा अपमानास्पद प्रसंग येण्याचाही संभव रहात नाही.

त्याच बरोबर माहितीच्या अधिकारामुळे तुम्हांला जागरुक व प्रगल्भ समाजाचे तितकेच जागरुक व प्रगल्भ नागरीक होण्याचे सामर्थ्य प्राप्त होते माहितीच्या अधिकारामुळे -

- तुम्हाला तुमच्या गावात चालू असलेल्या रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा,
- तुमच्या आसपास चालू असलेल्या बांधकामाची वैधता,
- तुमच्या वॉर्डात निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवाराचे पूर्व चारित्र्य
- शासकीय योजनेतील लाभार्थीची निवड इत्यादीबाबत माहिती विचारण्याची संधी मिळू शकते.

या अधिकारामुळे कार्यालयीन गोपनीयतेचे वातावरण दूर करता येईल तसेच शासकीय यंत्रणेस ते करीत असलेल्या कामांबद्दल उत्तरदायी ठरविता येईल. त्याचप्रमाणे तुमच्या सभोवतालच्या नागरिकांचे संघटन करुन भ्रष्टाचाराविरुद्ध

बेकायदेशीर कामाबाबत व बिनदिक्कतपणे चालू असलेल्या कुप्रतापांविरूद्ध लढा देता येईल. ही आपण आपल्या मुलाबाळांना व पुढील पिढ्यांना देत असलेली बहुमूल्य देणगीच म्हणता येईल.

भारतीय संसदेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा पारीत केला असून तो १३ ऑक्टोबर २००५ पासून अंमलात देखिल आला आहे. या अधिनियमामुळे प्रत्येक भारतीय नागरिकांस अत्यंत बहुमूल्य असा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्या अधिकाराची तसेच या अधिनियमाची तोंड ओळख करुन देण्यासाठी तसेच या अधिनियमाची नागरिकांना कशी मदत घेता येईल आणि हा अधिनियम राबविण्यासाठी कोणती यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. याची माहिती देण्यासाठी ही मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

## फायदे

या अधिनियमामुळे लोकशाही सामान्य माणसाच्या दारात आली आहे. माहिती प्राप्त करण्याच्या दृष्टीने तुम्हांला नागरीक म्हणून लोकसभेच्या / विधानमंडळांच्या सदस्याइतकेच अधिकार प्राप्त झाले आहे.

- आता तुम्हांला शासकीय विभाग कशी कामे करतात, कोणत्या कार्यपद्धती अवलंबवितात आणि जनतेस कशा प्रकारे सेवा देतात हे जाणून घेण्याचा अधिकार आहे.
- तुम्ही वेगवेगळ्या खात्यांच्या न्यायालयीन प्रशासकीय विभागांच्या फाईल्सची (नस्ती) यादी पाहू शकाल.
- तुम्ही तुमच्या अर्जाच्या सद्यस्थितीची माहिती हक्काने मागू शकाल व इतर अर्जदारांच्या अर्जाची योग्य ती माहिती घेवून तूलना करु शकाल.
- तुमच्या परिसरातील चालू असलेल्या विकास कामांची माहिती तुम्ही प्राप्त करु शकाल.

- तुम्हांला कुठलेही शासकीय कामावर उदा :- रस्त्याचे बांधकाम किंवा शाळेचे बांधकाम, वापरण्यात येत असलेले साहित्याचा साक्षांकित नमुना प्राप्त करता येईल.
- तुम्हांला कोणत्याही कामाच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता प्राप्त होवू शकेल.
- तुम्हांला तुमचा अर्ज का नाकारण्यात आला याबाबत माहिती मिळण्याचा पूर्ण अधिकार आहे.
- तुम्हांला शासकीय इस्पितळातील औषधांच्या साठ्यांबाबतची माहिती मिळू शकेल.
- स्वस्त धान्य दुकानातील धान्य साठ्याचीही माहिती करून घेता येईल.

## अधिनियमाची आवश्यकता

वर उल्लेखलेला अधिकार आपणांस या पूर्वी होता काय? वरीलप्रमाणे माहिती मिळाल्यानंतर आपणांस नवे सामर्थ्य प्राप्त झाले आहे असे आपणास निश्चित वाटत असेल. माहितीचे महत्व, विशेषतः ती जर आपले अधिकार आणि हितसंबंध याबाबतची असेल तर तिचे महत्व आगळेच असते. माहितीच्या अधिकारामुळे भारतीय नागरिकांना शासनाच्या कारभाराबद्दल त्याचप्रमाणे शासन मदत देत असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या कारभाराबाबत माहिती मिळविण्याचा प्रशस्त मार्ग खुला झाला आहे.

हा अधिनियम अस्तित्वात आल्यामुळे यापूर्वीच्या माहिती देण्याच्या अथवा राखून ठेवण्याच्या संदर्भातील कार्यालयीन गोपनीयतेचा अधिनियम १९२३ च्या तरतुदींसह इतर कायद्यातील अशा सर्व तरतुदी निष्प्रभ झाल्या आहेत.

यापूर्वी महाराष्ट्रात अशा स्वरुपाचा अधिकार नागरिकांना 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००३' अन्वये देण्यात आला होता. तो अधिनियम आता निरसित झाला असला तरी केंद्रीय कायद्याचे स्वरुप या अधिनियमासारखेच आहे. त्यामुळे आता राज्यशासनाच्या अधिनस्त कार्यालयाबाबत राज्यशासनाकडून

नव्याने तयार करण्यात आलेल्या पद्धतीनुरूप माहिती मागविता येईल तर केंद्रशासनाच्या अधिपत्याखाली कार्यालये / संस्थां कडून माहिती प्राप्त करण्यासाठी पद्धती व फी केंद्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे त्यानुसार कार्यवाही करता येईल.

## माहितीच्या अधिकाराचे स्वरूप

आपणास शासनाच्या कारभारातील कृती, अकृती किंवा प्रतिबंधित कृती जाणून घेण्यास नक्कीच आनंद वाटेल. या अधिनियमानुसार शासनाचे अभिलेख, दस्तऐवज, लॉगबुक्स, प्राप्त झालेले सल्ले, परीपत्रके, आदेश, निविदा, अहवाल यांच्या प्रती आपणास मिळविता येतील. त्याचप्रमाणे शासकीय प्राधिकरणांकडे उपलब्ध असलेले साहित्याचे नमुने, प्रतिकृती, इलेक्ट्रानिक्स स्वरुपातील साठविलेली माहिती, इमेल्स इत्यादी बाबी प्राप्त करता येतील. या अधिनियमामध्ये अभिलेख व साहित्य तपासण्याच्या अधिकाराचीही तरतूद आहे.

## हा अधिकार कसा वापरता येईल ?

जर आपणांस विशिष्ट माहिती प्राप्त करावयाची असेल तर आपण संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करावा. आपण जर आडवळणी गावांमध्ये रहात असाल तर आपला अर्ज त्या विभागाच्या वा त्या खात्याच्या माहिती अधिकाऱ्याकडे सादर करावा. हा माहिती अधिकारी तुमच्या अर्जावर ३० **दिवसात** कार्यवाही करेल असे त्याच्यावर बंधन आहे. या अधिनियमात जरी नमुना अर्जाचे बंधन घालण्यात आले नसले तरीही सोईकरिता म्हणून अर्जाचा नमुना पुढे दिला आहे. त्यासोबत रुपये १०/- रोखीने अथवा बँकर्स चेकने अथवा डिमांड ड्राफ्टने अथवा कोर्ट फी स्टँप लावून भरावयाचे आहे. असे न केल्यास अर्ज नाकारला जाऊ शकेल. एका अर्जात शक्यतो एकाच खात्यासंबंधीची माहिती विचारल्यास आपला अर्ज लवकर विचारात घेतला जाऊ शकेल.

सदर अर्ज खालील नमुन्यात इंग्रजी किंवा आपल्या राज्याच्या मान्यता प्राप्त शासकीय भाषेतसुद्धा करता येईल.

## अर्जाचा नमुना

प्रति,

शासकीय माहिती अधिकारी

(कार्यालयाचे नाव व पत्ता)

१. अर्जदाराचे पूर्ण नाव :

२. पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता :

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :

- विषय : ____________________
- आवश्यक असलेल्या दस्तऐवजाचे वर्गीकरण (कलम ४ खाली प्रसिद्ध केले असल्यास) :
- कोणत्या कालावधीची माहिती आवश्यक आहे?
- माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः :

ठिकाण :-

तारीख :- अर्जदाराची स्वाक्षरी

**फी विषयक :** सोबत रुपये १०/- रोखीने अथवा बँकर्स चेकने अथवा डिमांड ड्राफ्टने अथवा कोर्ट फी स्टँप

आपणास अर्जाची फी म्हणून रु. १०/- ही रोख अथवा डिमांड ड्राफ्टने अथवा बँकर्स चेकच्या अथवा कोर्ट स्टॅम्पच्या स्वरुपात अदा करावी लागेल.


आपणास माहिती पुरविण्याचा निर्णय व त्यासाठी आवश्यक असलेली वेगळी फी माहिती अधिकाऱ्याकडून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. आवश्यक असलेली माहिती जर दस्तऐवज स्वरुपात असेल तर त्या माहितीसाठी प्रत्येक पानासाठी रु. २/- आकार पडेल. माहिती इलेक्ट्रॉनिक माध्यमात हवी असल्यास तिचे शुल्क प्रत्येक सीडी / फ्लॉपीसाठी रु. ५०/-

आपणास साहित्याचा नमुना हवा असल्यास त्यासाठी संबंधित साहित्य वापरणाऱ्या कार्यालयाने जाहीर केलेली दरसूची पहावी.

आपण जर दारिद्र्य रेषेखालील नागरीक असाल तर सदर माहिती आपणांस मोफत पुरविण्यात येईल.

- आपणास माहिती मागण्याचे कारण कुणीही विचारु शकणार नाही. कारण माहिती हा तुमचा अधिकार आहे आणि योग्य कारणाशिवाय तो कोणालाही नाकारता येणार नाही.
- आपणास ३० दिवसांच्या आत मागितलेली माहिती मिळेल. तथापि अतिरिक्त फी भरण्यासाठी आपल्याला लागणारा कालावधी यातून वगळण्यात येईल.
- आवश्यक असलेली माहिती एखाद्याच्या जीवित रक्षणाच्या दृष्टीने अथवा मुक्ततेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास आपणास ती ४८ तासाच्या आत तातडीने मागता येईल.
- जर आपणास मागितलेली माहिती विहित मुदतीत मिळाली नाही अथवा झालेल्या उशिराबाबत स्पष्टीकरणही विहीत मुदतीत देण्यात आले नाही तर आपणास सदर माहिती मोफत मिळविण्याचा अधिकार राहील.
- आपणास लिहिता वाचता येत नसेल किंवा आपण अपंग असाल तर माहिती अधिकारी आपल्याला योग्य ती सर्व मदत करेल.

आता आपण कोणत्याही केंद्रशासनाच्या अथवा राज्यशासनाच्या कार्यालयातून अथवा शासनाच्या संस्थांकडून / महामंडळाकडून अथवा ज्यांना शासनांकडून पुरेसे अनुदान मिळते अशा अशासकीय संस्थांकडून माहिती मिळवू शकता. या कायद्याने केंद्र व शासनाच्या अखत्यारीतील विषयांसाठी वेगवेगळी यंत्रणा निर्माण केली आहे.



## प्रक्रियेचा आलेख

**माहिती अधिकारी**

अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसात

- माहिती एकत्रित करेल
- अर्जदारास फी च्या रकमेबाबतचे स्पष्टीकरण आणि फी भरण्याची अपेक्षित तारीख कळवेल.

↓

**अर्जदार खालील प्रकारे फि भरू शकेल**

- रोख / डिमांड ड्राफ्ट अथवा बँकर्स चेक किंवा कोर्ट फी स्टँम्प

↓

फी भरल्याचा पुरावा पावती अथवा चलनाच्या स्वरुपात माहिती अधिकाऱ्यास दाखविल्यावर माहिती अधिकारी माहितीच्या प्रती देईल.

↓

जर माहिती नाकारण्यात आली / माहिती मिळण्यास उशीर झाला / चुकीची अथवा त्रुटीयुक्त माहिती मिळाली तर

- पहिले अपिल अपिलीय अधिकाऱ्याकडे ३० दिवसात करता येईल.
- दुसरे अपिल केंद्र / राज्य माहिती आयुक्तालयाकडे ९० दिवसात करावे.

माहिती अधिकारी अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसात अर्जदारास खालील बाबी अवश्य कळवेल

- माहिती नाकारण्याचे कारण
- किती दिवसात अपिल करता येईल याची माहिती
- कोणाकडे अपिल करायचे त्या अधिकाऱ्याचा तपशील

## इतर काही सुविधा

### स्वयंप्रेरणेने प्रकशित करावयाची माहिती

१. विविध शासकीय खात्यांमार्फत माहितीचे स्वतःहून प्रसृतीकरण - या कायद्यांतर्गत आपल्याला न मागताही बरीचशी माहिती मिळू शकते. जसे -

- प्रत्येक कार्यालयाची संरचना, कार्ये, कर्तव्ये तसेच त्यांच्या कार्यपद्धती, उद्दिष्टे व उद्दिष्टपूर्ती,
- प्रत्येक कार्यालयात उपलब्ध असलेल्या संचिका,
- प्रत्येक कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सूची,
- कार्यालयात कार्यरत असलेल्या व्यक्ती व त्यांचा तपशील,
- कार्यालयास उपलब्ध झालेला निधी,
- प्रत्येक कामावर खर्च होणारा निधी, कार्यान्वित असलेले प्रकल्प, लाभार्थींची यादी,
- परवाना प्राप्त व्यक्तींची यादी इ.

ही सर्व माहिती नागरीकांना पाहण्यासाठी खुली असेल. या माहितीसाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही.

२. इतर संगणकीय सुविधा

- आपण ई-मेल द्वारा माहिती मागणीचा अर्ज अशी सुविधा तयार झाल्यावर करु शकाल.
- जर आपण मागितलेली माहिती संगणकावर उपलब्ध असल्यास ती संगणकावर उपलब्ध असल्याबाबतची प्रसिद्धी सदरच्या कार्यालयाने करावयाची आहे.

- तुम्ही अशा माहितीची सॉफ्ट कॉपी मागवू शकता. त्यासाठी निश्चित केलेली फी आपणास दयावी लागेल.
- माहिती मिळणे सोपे व्हावे म्हणून कार्यालयातील शक्यतो सर्व माहिती संगणकीकृत करण्यासाठी प्रत्येक प्राधिकाऱ्याने संगणकीकरणाचा कृति आराखडा तयार करुन तो प्रसिद्ध करावयाचा आहे.

३. गुप्ततेची कालमर्यादा - २० वर्षपेक्षा जास्त कालावधीची कोणतीही माहिती गुप्त राहू शकत नाही. कायदयाच्या अपवादात मोडणाऱ्या माहिती सुध्दा काही गुप्त स्वरूपाची माहिती वगळता, २० वर्षांनी नागरिकांस पहावयास खुली असेल.

**माहिती न मिळाल्यास**

- एखादया कार्यालयात माहिती अधिकारी नेमलेला नसल्याबाबत आपण माहिती आयुक्तांकडे तक्रार करू शकता.
- तुमचा माहिती मिळण्याचा अर्ज माहिती अधिकाऱ्याकडून नाकारला गेल्यास तुम्ही माहिती अधिकाऱ्याने कळविलेल्या अपिलीय अधिकाऱ्याकडे ३० दिवसात अपिल करू शकता. अशा नकाराची कारणे कळण्याचा आपल्याला अधिकार आहे.
- ४५ दिवसात आपल्याला अपिलाचा निकाल मिळाला पाहिजे. या निकालानेही आपले समाधान झाले नाही तर ९० दिवसाच्या कालावधीत आपण केंद्रीय / राज्य माहिती आयुक्तांकडे दुसरे अपिल करू शकता.
- माहिती मिळण्यासाठी अर्ज केल्यापासून ३० दिवसात आपणास काहीही कळविण्यात आले नाही तर आपल्याला माहिती नाकारण्यात आलेली आहे असे गृहीत धरुन पुढची कार्यवाही आपणास सुरू करता येईल.

- जर आपला अर्ज अथवा अपिल स्विकारण्यास नकार देण्यात आला तर आपण केंद्रीय / राज्य माहिती आयुक्तालयांकडे तक्रार नोंदवू शकता.
- माहिती मिळण्यासाठी आपल्याकडून आकारण्यात येणारी फी अवाजवी आहे असे आपले मत झाल्यास आपणास राज्य / केंद्र माहिती आयुक्तालयाकडे अर्ज करता येईल.

**हा अधिकार जोपासणारी संस्था**

नागरिकांचे हक्क व व्यापक जनहितांचे संरक्षण करण्यासाठी माहिती आयुक्तालय नावाची एक खास संस्था या कायद्याखाली निर्माण करण्यात आली आहे. या आयुक्तालयाला काही खास अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

- दिवाणी कार्यपध्दतीची संहीता १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाप्रमाणे ते चौकशी सुरू करू शकतात.
- वादातील कोणतेही अभिलेख ते तपासू शकतात.

**माहिती आयुक्त लोकप्राधिकाऱ्यास खालील निर्देश देवू शकतात**

- विशिष्ट नमुन्यात माहिती देण्याविषयी.
- माहिती अधिकाऱ्याची नेमणूक करण्याविषयी.
- विशिष्ट प्रकारची माहिती प्रसिध्द करण्याबाबत.
- अभिलेख ठेवण्याच्या पध्दती बदलण्याविषयी.
- माहिती अधिकारी प्रशिक्षण देण्याविषयी.
- अर्जदारास नुकसान भरपाई देण्याविषयी.

### माहिती अधिकाऱ्याने

- अकारण माहिती देण्याचे नाकारल्यास.
- जाणूनबुजून अर्धवट चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास.
- माहिती नष्ट केल्यास.
- माहिती मिळण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा आणल्यास.

माहिती आयुक्त हे माहिती अधिकाऱ्यास रु. २५0/- प्रती दिन प्रमाणे जास्तीत जास्त रूपये २५,000/- पर्यंत दंड ठोठावू शकतात. तसेच अशाप्रकारे एखादया माहिती अधिकाऱ्याकडून वारंवार माहिती देण्यास कसूर होत असल्यास त्याच्या विरुध्द खातेनिहाय कार्यवाहीची शिफारसही करू शकतात.

### माहिती जाहीर करण्यापासून सूट

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकाऱ्यांवर काही ठिकाणी वाजवी बंधनेही ठेवण्यात आली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २00५ मध्ये देखील काही प्रकारची माहिती देण्यापासून अथवा उघड करण्यापासून सूट देण्यात आली आहे. सदर माहिती मात्र प्राप्त होवू शकणार नाही अशा बाबी पुढीलप्रमाणे.

- जी माहिती उघड केल्यामुळे भारताचे सार्वभौमत्व व एकात्मतेवर विपरीत परिणाम होईल.
- जी माहिती कुठल्याही न्यायालयाने प्रसिध्द करण्यास थेट बंदी घातली आहे.
- जी माहिती उघड केल्यामुळे लोकसभा अथवा राज्य विधानमंडळाचा अथवा सदस्यांचा हक्क भंग होईल.
- जी माहिती उघड केल्यामुळे व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा हक्क किंवा कॉपीराईट्सचा भंग होईल.

- जी माहिती एखादया व्यक्तीच्या विश्वसनीय संबंधांमुळे त्याला प्राप्त झालेली आहे अशी माहिती.
- विदेशी सरकार कडून गुप्तपणे प्राप्त झालेली माहिती.
- एखादी माहिती उघड केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे जीवन अथवा शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायदयाच्या अंमलबजावणीकरण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनासाठी गुप्तपणे दिलेल्या माहितीचे सूत्र किंवा केलेले साह्य ओळखता येईल अशी माहिती.
- जी माहिती मंत्री मंडळाचे दस्तऐवज या स्वरुपाची असेल.
- जी माहिती उघड़ करण्याचा कोणत्याही हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तिक स्वरुपाची माहिती.

काही निवडक अन्वेषण व सुरक्षा संस्थांना या अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्यात आली आहे. मात्र या संस्थेतील भ्रष्टाचारासंबंधी आरोप अथवा मानवी हक्कांचे उल्लंघन याबाबत माहिती प्राप्त करता येईल.

महाराष्ट्र शासन हे माहितीच्या अधिकाराबाबत संपूर्ण देशात अग्रेसर आहे. नोव्हेंबर २००५ पर्यंत नव्या व जुन्या अधिनियमांतर्गत ६१,४७१ अर्जाद्वारे नागरिकांनी माहितीच्या अधिकाराचा उपयोग केला आहे. आपणही तो करूया !

अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे संपर्क साधा.

***

## आमचे ध्येय

राज्यातील जनतेचा समतोल व शाश्वत विकास साधणाऱ्या लोकाभिमुख सुप्रशासनाला प्रशिक्षणाच्या माध्यमातून सतत उत्तेजन देणे व सक्षम बनविणे हे आमचे ध्येय आहे.

प्रशासकीय अधिकारी, सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधींना उपयोजित संशोधनावर आधारीत अनुभवसिद्ध ज्ञान, सुयोग्य तंत्रज्ञान व आवश्यक कौशल्य कल्पक प्रशिक्षणाद्वारे देण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

किमंत : दहा रुपये